SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

गुरुवार, दिनांक ७ ऑगस्ट, २०२५

अधिसुचना

क्र. : ११५/२०२५ **दिनांक : ०७/०८/२०२५**

विषय : विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयीन क्रीडा शुल्कामध्ये बाढीबाबत..

१. सर्व संबंधितांच्या माहितीकरीता अधिसुचित करण्यात येते की, विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय व विद्यापीठाचे सर्व पद्व्युत्तर विभागामध्ये शैक्षणिक सत्र २०२५-२०२६ पासुन प्रवेशित होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांकडून सद्यःस्थितीत अधिसुचना क्रमांक ७७/२०२४ दिनांक १२.०७.२०२४ यामधील **Part A** नुसार अस्तित्वात असलेल्या खेळ व क्रीडा शुल्काची **(Games & Sports Fee)** रक्कम रुपये १७६/- (अक्षरी रुपये एकशे छ्याहत्तर फक्त) यामध्ये वाढ करुन रुपये ३००/- (अक्षरी रुपये तीनशे फक्त) इतके खेळ व क्रीडा शुल्क **(Games & Sports Fee)** (विद्यापीठ हिस्सा रुपये १००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) व महाविद्यालय हिस्सा रुपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे फक्त)) आकारण्याकरीता,

२. विद्यापीठाव्दारे प्रसिध्द करण्यात आलेली अधिसुचना क्रमांक ७७/२०२४ दिनांक १२.०७.२०२४ यामधील **Part-B University Fees** यामधील अ.क्र.०७ वरील **Sports Fee** यामध्ये रुपये ५५/- (अक्षरी रुपये पंचावन्न फक्त) ऐवजी रुपये १००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) याप्रमाणे वाढ करुन **Sports Fee** ची रक्कम विद्यापीठ खाती जमा करण्याबाबत,

३. अधिसुचना क्रमांक ७७/२०२४ दिनांक १२.०७.२०२४ यामधील **Part A** मधील खेळ व क्रीडा शुल्क **(Games & Sports Fee)** व **Part-B University Fees** यामधील अ.क्र.०७ वरील **Sports Fee** या रकमेमध्ये दर २ वर्षानंतर १० टक्के रक्कम वाढ करण्याकरीता क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाने दिनांक ०३.०५.२०२५ रोजीच्या सभेत विषय क्रमांक ३९ अन्वये केलेल्या शिफारसीनुसार दिनांक १६.०६.२०२५ रोजी संपन्न झालेल्या अधिष्ठाता मंडळ सभेने विषय क्र. ५६ अन्वये विद्वत परिषदेस शिफारस केली होती.

४. दिनांक १६.०६.२०२५ रोजी संपन्न झालेल्या अधिष्ठाता मंडळ सभेने विषय क्र. ५६ अन्वये विद्वत परिषदेस कलेल्या शिफारसीस विद्वत परिषदेने दिनांक ०८.०७.२०२५ रोजी संपन्न झालेल्या सभेत विषय क्र.४६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार शैक्षणिक सत्र २०२५-२०२६ पासुन महाविद्यालयीन खेळ व क्रीडा शुल्क **(Games & Sports Fee)** व **Sports Fee** यामध्ये रकाना क्र. ४ नुसार दर्शविल्याप्रमाणे वाढ करण्यात आली असुन प्राप्त होणाऱ्या शुल्काचे संवितरण रकाना क्र. ५ मध्ये दर्शविल्यानुसार करण्यात यावे.

अ.क्र.	**महाविद्यालयाने आकारावयाच्या शुल्काचा प्रकार**	**विद्यमान महाविद्यालय आकारत असलेले क्रीडा शुल्क**	**शैक्षणिक सत्र २०२५-२०२६ पासुन महाविद्यालयाने आकारावयाचे वाढीव क्रीडा शुल्क**	**वाढीव शुल्काचे संवितरण**	
१	२	३	४	५	
				विद्यापीठ खाती जमा करावयाचा हिस्सा रुपये	**महाविद्यालयीन हिस्सा रुपये**
१.	महाविद्यालयीन खेळ व क्रीडा शुल्क **(Games & Sports Fee)**	१७६	३००	प्रति विद्यार्थी रुपये १००/-	प्रति विद्यार्थी रुपये २००/-
२.	महाविद्यालयीन **Sports Fee**	५५	१००	प्रति विद्यार्थी रुपये १००/-	निरंक

स्वा/-

(डॉ. अविनाश असनारे)

कुलसचिव

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ